# रत्नागिरी जिल्हा नगरपरिषद आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवेने भरतीसाठी जाहिरात

**क्रमांक ससाशा/नपाप्र/नप(गट-क)/पदभरती/सीआर-१७/२०१२, दिनांक ०६/१२/२०१२**

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांजकडील पत्र क्रमांक नपप्रसं/कक्ष-५/सरळसेवा भरती/न.प.संवर्ग श्रेणी-क/२०११, दिनांक २९/१०/२०११ व पत्र क्रमांक नपप्रस/कक्ष-५/सरळसेवा भरती/२०१२, दिनांक २९/१२/२०१२ अन्वये रत्नागिरी जिल्हातील ५ नगरपरिषद आस्थापनेवरील संवर्ग श्रेणी - क मधील रिक्त असलेली एकूण २२ पदे भरणेबाबत कळविले आहे. त्यानुसार सदर पदांसाठी सरळसेवेने निवड करण्याकरिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात **दिनांक २१/१२/२०१२ पर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नाव | प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहित |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक क वर्ग नगरपरिषदेकरीता-नगरपरिषद अभियंता | अनुसूचित जमाती | १ | ० | १ |
| | | विमुक्त जाती (अ)/ भटक्या जमाती (ब)/ भटक्या जमाती (क) | १ | ० | १ |
| | | खुला | ४ | १ | ३ |
| | **एकूण (अ)** | | **६** | **१** | **५** |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक | अनुसूचित जाती | १ | ० | १ |
| | | खुला | १ | ० | १ |
| | **एकूण (ब)** | | **२** | **०** | **२** |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक | अनुसूचित जाती | १ | ० | १ |
| | | खुला | १ | ० | १ |
| | **एकूण (क)** | | **२** | **०** | **२** |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक<br>क वर्ग नगरपरिषदेकरीता-जलदाय, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | अनुसूचित जाती | १ | ० | १ |
| | | अनुसूचित जमाती | १ | ० | १ |
| | | विमुक्त जाती (अ)/ भटक्या जमाती (ब)/ भटक्या जमाती (क) | १ | ० | १ |
| | | खुला | ३ | १ | २ |
| | **एकूण (ड)** | | **६** | **१** | **५** |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-सहाय्यक लेखापरीक्षक/लेखापाल<br>क वर्ग नगरपरिषदेकरीता-लेखापरीक्षक/ लेखापाल | अनुसूचित जाती | १ | ० | १ |
| | | अनुसूचित जमाती | १ | ० | १ |
| | | इतर मागासवर्ग | १ | ० | १ |
| | | खुला | ३ | १ | २ |
| | **एकूण (इ)** | | **६** | **१** | **५** |
| | **एकूण (अ) + (ब) + (क) + (ड) + (इ)** | | **२२** | **३** | **१९** |

## जिल्हयातील ५ नगरपालिकांचा तपशिलः

| | | |
|---|---|---|
| **१. ब वर्ग नगरपालिकाः** | १. नगरपरिषद चिपळूण | २. नगरपरिषद रत्नागिरी |
| **२. क वर्ग नगरपालिकाः** | १. नगरपरिषद राजापूर | २. नगरपरिषद खेड |
| | ३. नगरपंचायत दापोली | |

## १. टिप सर्व पदांसाठी :

१. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी व अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी किंवा जास्त होणे) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२. नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे, रद्द करणेचे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, बदल करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

३. शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

४. महिला या समांतर आरक्षणात लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक आरक्षणातील/प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.त्यामुळे या आरक्षणातील/प्रवर्गातील पुरुष उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील.महिला उमेदवार पात्र असल्यास गुणवत्तेनुसार पुरुष उमेदवार पात्र असून ही विचारात घेतला जाणार नाही.

५. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास/रहिवासी असावा. वरील पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकतो.

## २. वेतनश्रेणी

| अ.क्र. | संवर्ग/पदाचे नाव | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक<br>क वर्ग नगरपरिषदेकरीता-नगरपरिषद अभियंता | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये ४२०० अधिक नियमानुसार देय भत्ते. |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये ४२०० अधिक नियमानुसार देय भत्ते. |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये ४२०० अधिक नियमानुसार देय भत्ते. |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-पर्यवेक्षक<br>क वर्ग नगरपरिषदेकरीता-जलदाय, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये ४२०० अधिक नियमानुसार देय भत्ते. |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी-क)<br>ब वर्ग नगरपरिषदेकरीता-सहाय्यक लेखापरीक्षक/लेखापाल<br>क वर्ग नगरपरिषदेकरीता-लेखापरीक्षक/ लेखापाल | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये ४२०० अधिक नियमानुसार देय भत्ते. |

## ३. पात्रतेच्या अटी

**३.१ वयोमर्यादा - (दिनांक ३०/११/२०१२ रोजीची गणली जाईल)**

**३.१.१** उमेदवाराचे वय खुल्या वर्गासाठी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे इतके राहील.तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहिल.

**३.१.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरातीतील मसुद्यात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

(एक) मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल ३८ वर्षापर्यन्त.

(दोन) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांकरिता ४५ वर्षापर्यंत

(तीन) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू ३८ वर्षे (सर्वसाधारण) व ४३ वर्षे (मागासवर्गीय) पेक्षा जास्त नसावे.

(चार) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना ४५ वर्षे

(पाच) अपंग उमेदवारांकरिता ४५ वर्षे

(सहा) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग- ४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

(सात) अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यन्त राहील.

(आठ) पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांकरीता ४६ वर्षे.

**३.२ शैक्षणिक अर्हता - (दिनांक ३०/११/२०१२ रोजी पूर्ण केली असली पाहिजे)**

| **पदाचे नांव** | **शैक्षणिक व अन्य अर्हता** |
|---|---|
| महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | **१.** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी किंवा पदविका किंवा अन्य तत्सम अर्हता आवश्यक. |
| | **२.** एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण किंवा संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी विहित केलेले संगणक प्रमाणपत्र. |
| | **३.** कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |
| महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क) | **१.** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrial) अभियांत्रिकी शाखेची पदवी किंवा पदविका किंवा अन्य तत्सम अर्हता आवश्यक. |
| | **२.** एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण किंवा संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी विहित केलेले संगणक प्रमाणपत्र. |
| | **३.** कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |
| महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क) | **१.** मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक (Computer) अभियांत्रिकी शाखेची पदवी किंवा पदविका किंवा अन्य तत्सम अर्हता आवश्यक. |
| | **२.** एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण किंवा संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी विहित केलेले संगणक प्रमाणपत्र. |
| | **३.** कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |

| | |
|---|---|
| महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क) | **१.** मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/पर्यावरण (Mechanical/ Environmental) शाखेची पदवी किंवा पदविका आवश्यक. |
| | **२.** एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण किंवा संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी विहित केलेले संगणक प्रमाणपत्र. |
| | **३.** कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |
| महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी-क) | **१.** मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य (B.Com) शाखेची पदवी. |
| | **२.** एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण किंवा संचालक, माहिती व तंत्रज्ञान यानी विहित केलेले संगणक प्रमाणपत्र. |
| | **३.** कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |

**३.३ अतिरिक्त शैक्षणिक अर्हता -**

**३.३.१** उमेदवार विभागीय परिक्षा तसेच हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार परिक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

**३.४ उपरोक्त नमूद पदांकरीता अनुभवाच्या अर्हतेचा दिनांक ३०/११/२०१२ रोजी पर्यंतचा गणला जाईल.**

## ४. अर्जासोबत शुल्क (फी)(रुपये)

**४.१**

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | २००/- | १००/- |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क) | | |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क) | | |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क) | | |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी-क) | | |

**४.२** सदरचे परीक्षा शुल्क अर्जासोबत **"रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डर"** ने **"जिल्हाधिकारी रत्नागिरी (परीक्षा शुल्क)"** या नावाने काढण्यात यावे. ही रक्कम कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही. माजी सैनिकउमेदवारांनी अर्जासोबत शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## ५. परीक्षेचे स्वरुप

**५.१ महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क)/महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क)/महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क)/महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क)/महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी-क) या संवर्गातील पदांसाठी -**

**५.१.१** कमीत कमी अर्हता पदवी/पदविका आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी/पदविका परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी तसेच संबंधित विषयांवरील तांत्रिक प्रश्न (प्रत्येक पदानुसार) अशी एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.परीक्षेचे माध्यम इंग्रजी तसेच सबंधित विषयांवरील तांत्रिक प्रश्न वगळता मराठी राहील. **जे उमेदवार लेखी परिक्षेत उत्तीर्ण होतील (किमान ४५ टक्के) असे उमेदवाराच मुलाखतीसाठी (२५ गुणांची) पात्र ठरतील.**. लेखी परीक्षेतील विषयानुसार गुण व मुलाखतीचे गुण यांचा तपशिल खालीलप्रमाणे असेल.

| मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बौध्दिक चाचणी | संबंधित विषयावरील तांत्रिक प्रश्नांचे गुण | लेखी परीक्षेचे एकूण गुण | मुलाखत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० गुण | ३० गुण | ३० गुण | ३० गुण | ८० गुण | २०० गुण | २५ गुण | २२५ गुण |

**५.१.२** शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७/०६/२००८ मधील मुद्दा ५ नुसार मुलाखतीच्या निवड यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**५.१.३** उमेदवारांची निवड करताना उमेवाराने लेखी परीक्षेमध्ये व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करुन निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**५.१.४** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रानिमं २०१०/२०९/प्र.क्र.६६/१०/१३-अ, दिनांक १९ जून, २०१० अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी **फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करण्याचा आहे,** याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## ६. परीक्षेचा निकाल -

**परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.**

**६.१** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर

**६.२** मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती ), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर

**६.३** शारिरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

**६.४** माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

**६.५** स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

**६.६** वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)
वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**७.** **स्पर्धा परीक्षा रत्नागिरी केंद्रावर घेण्यात येईल. परंतू, उमेदवारांची संख्या जास्त असल्यास या जिल्ह्यातील अन्य तालुक्यांच्या उपकेंद्रांवर घेण्यात येईल.**

**८.** **अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्र/प्रमाणपत्रे जोडू नयेत. (मूळ प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडू नयेत.)**

**८.१** सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२७/(२०००)/१२, दिनांक २८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही/२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै, २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या **नमुना - अ** मधील विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. (अविवाहीत अर्जदारांनी सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.)

**८.२** विहीत वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत. अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमूद करावा.अर्जासोबत संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**८.३** किमान शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. माध्यमिक शालांत परीक्षा (एस. एस. सी.) उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराच्या नावात कोणताही बदल झाला असल्यास, त्या पुष्टयर्थ संबंधित शासन राजपत्रांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**८.४** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता शासकीय सेवेत ठेवण्यात आलेल्या तीस टक्के आरक्षणाच्या सवलतीकरीता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे वर्ष २०१२-१३ हया कालावधीचे **(अर्थात दिनांक ०१/०४/२०१२ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले)** प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अन्य प्रवर्गातील महिलांना, महिलांसाठी राखीव पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास, त्यांनी वरील शासन निर्णय दिनांक २५/०५/२००१ मधील तरतूदी अवलोकनात घ्याव्यात.

**८.५** उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. ह्या प्रवर्गांना लागू करण्यात आले आहे. त्यानुसार उक्त प्रवर्गातील उमेदवारांनी शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक ५, दि.३० जून, २००६ मधील सोबतच्या नमुन्यात **वर्ष २०१२-२०१३ ह्या** (चालू वित्तिय वर्षाचे) कालावधीकरिता वैध असलेले (अर्थात **दिनांक ०१/०४/२०१२ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले**) **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे**.

**८.६** मागासवर्गीय उमेदवार ज्या प्रवर्गातून अर्ज करीत असेल त्या प्रवर्गाचे सक्षम प्राधिका-याने दिलेले **जात/जमाती प्रमाणपत्राची** साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

**८.७** उमेदवार ज्या समांतर आरक्षणामधून अर्ज करीत असेल त्या समांतर आरक्षणाबाबतचे **सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत** जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवाराला संबंधित समांतर आरक्षणातील वयोमर्यादेतून सूट मिळणार आहे. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**८.८** अपंग उमेदवाराने अपंगत्वाचे विहीत नमून्यातील जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय मंडळ यांच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**८.९** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०/४/२००५ मधील अ.क्र.४ (क) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत

असलेल्या अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवाराने त्याबाबतची क्रिडा/खेळ विषयक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

**८.१०** प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांनी त्याबाबतच्या वैध प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडणे बंधनकारक आहे.

**८.११** अंशकालिन उमेदवाराने शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व स्वयंरोजगार मागदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत प्रमाणपत्र.

**८.१२** माजी सैनिक उमेदवारांनी डीस्चार्ज बुकाची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

**८.१३** सर्व पदांसाठी कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

**८.१४** महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्राची (डोमेसाईल) साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

## ९. उमेदवाराचा अर्ज खालील कारणांमुळे अपात्र ठरू शकतो.

९.१ अर्जातील मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला असेल, तर

९.२ अर्ज सदोष रीतीने भरलेला असल्यास

९.३ अर्जासोबत रेखांकीत भारतीय पोस्टल ऑर्डर विहीत रक्कमेची भरून सादर केली नसल्यास.

९.४ अर्जावर स्वाक्षरी नसल्यास

९.५ अर्ज स्वीकारण्याची विहीत केलेल्या दिनांकांनंतर अर्ज प्राप्त झाला असल्यास.

९.६ अर्जावर छायाचित्र चिकटविलेले नसल्यास.

९.७ विहीत शैक्षणिक अर्हता धारण केलेली नसल्यास

९.८ वयाची अट पूर्ण करत नसल्यास

९.९ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन (नमूना-अ) अर्जासोबत सादर केले नसल्यास

**९.१० वरील अ.क्र. ८ मध्ये नमूद केलेल्या अनिवार्य प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती न जोडल्यास**

## १०. <u>पात्रतेनंतरच्या अटी व शर्ती</u>

**१०.१** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

**१०.२** नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

**१०.३** निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**१०.४** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची रत्नागिरी जिल्हयातील नगरपरिषद/नगरपंचायती यांच्या आस्थापनेच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे उमेदवारास बंधनकारक असेल.

**१०.५** निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून गुणक्रमानुसार उमेदवारांना नियुक्ती ही मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर देण्यात येणार असल्याने संबंधित उमेदवार संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास किंवा संबंधित पदावर हजर न झाल्यास

निवडसूचीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार किंवा अतिरिक्त निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार (संबंधित प्रवर्ग/समांतर आरक्षणातील निवड यादीतील गुणानुक्रमानुसार/ज्येष्ठतेनुसार) उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल. निवडसूची तयार करताना विचारात घेतलेल्या रिक्त पदांच्या व्यतिरिक्त नंतर रिक्त झालेल्या पदांसाठी निवड सूचीतील उमेदवारांची शिफारस करण्यात येणार नाही. जाहिरामध्ये नमूद केलेली पदे ही या जाहिरातीपूरतीच मर्यादीत आहेत. अतिरिक्त निवड यादीमधील उमेदवार हे वरील नमूद कारणास्तव अंतिम निवड झालेला उमेदवार अपात्र ठरला तरच अतिरिक्त निवड यादीमधील उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन हजर होणे अनिवार्य आहे.

**१०.६** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्यानंतर विहीत केलेल्या संबंधित विभागांच्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार परिक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास त्याला/तिला परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

**१०.७** मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

**१०.८** निवड झालेल्या उमेदवारांची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी करण्यात येईल.

## ११. विशेष सूचना

**११.१** प्रत्येक पदासाठी स्वतंत्र लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

**११.२** **प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. एकाच अर्जामध्ये एका पेक्षा अधिक पदांचा उल्लेख केल्यास सदर अर्ज अपात्र करण्यात येईल.**

**११.३** उमेदवारांने अर्ज सुवाच्च व वाचनीय अक्षरात भरावा. उमेदवारांनी अर्जातील कोणताही रकाना रिकामा सोडू नये तसेच रकान्यामध्ये दिलेली माहिती चुकीची नाही याची खात्री करावी. अर्जातील माहिती संगणकावर भरली जाणार असल्याने व त्या आधारे अर्ज पात्र व अपात्र ठरविण्यात येणार असल्याने या सूचनेचे पालन करण्यात यावे. अर्जाची पात्रता व अपात्रता उमेदवारांना लेखी स्वरुपात कळविली जाणार नाही. **पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक २९/१२/२०१२ रोजी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर (www.ratnagiri.gov.in) प्रसिध्द करण्यात येईल तसेच या कार्यालयाच्या स्वागत कक्षामध्ये उमेदवारांना पहाण्यासाठी ठेवण्यात येईल.**

**११.४** उमेदवारांनी वरील नमूद संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या किंवा या कार्यालयाच्या स्वागत कक्षामध्ये उमेदवारांना पहाण्यासाठी ठेवण्यात आलेल्या प्रसिध्द केलेल्या पात्र व अपात्र यादीबाबतचे आक्षेप **दिनांक ०५/०१/२०१३ पर्यन्त** जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी यांचे नांवे पाठविण्याचे आहेत. **विहीत दिनांकानंतर या कार्यालयाकडे प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.**

**११.५** लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी त्यांची पात्रता ज्या प्रवर्गातून व समांतर आरक्षणातून झालेली आहे. याबाबतची खात्री वरील संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या पात्र यादीमध्ये पहाणे बंधनकारक आहे. **वरील अ.क्र.११.४ नमूद दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नसल्याने उमेदवाराने वेळीच पात्र व अपात्र यादी संकेत स्थळावर किंवा या कार्यालयाच्या स्वागत कक्षामध्ये पहाणे बंधनकारक आहे.**

**११.६** महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

**११.७** फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील

यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

११.८ उमेदवाराने आपले अर्ज **जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी, पोस्ट बॉक्स नंबर ७ , प्रधान डाकघर, गाडीतळ, ता. जि. रत्नागिरी ४१५ ६१२** या पत्त्यावर **दिनांक २१/१२/२०१२** पर्यंत साध्या पोस्टाने पाठवावेत. सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढ-या को-या कागदावर टंकलिखीत/हस्तलिखीत सादर करता येतील. मात्र खाडाखोडीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. **अर्जाचे पाकिटावर ठळक अक्षरात अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी - पदाचे नाव - असा उल्लेख करावा.**उमेदवारांने आपले अर्जासोबत रिकामा लखोटा व त्या लखोटयावर स्वतःचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद करावा. तसेच रिकाम्या लखोटयावर रु. ५/- चे पोस्टाचे तिकीट चिकटवावे. समक्ष अथवा कुरीअरने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

११.९ अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच टपाल विभागाच्या विलंबामुळे अर्ज विहित मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**११.१० संबंधित उमेदवाराने वरील अ.क्र. ८ मध्ये नमूद केलेली विहीत प्रमाणपत्रांच्या/ दाखल्यांच्या दाखल्यांच्या सांक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे बंधकारक आहे. अन्यथा त्या प्रवर्गासाठी अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. या व्यतिरिक्त कोणीही उमेदवारांनी अन्य प्रमाणपत्रांच्या/दाखल्यांच्या मूळ प्रती/साक्षांकित प्रती जोडू नयेत. मूळप्रती गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.**

**११.११ अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.**

११.१२ निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत, त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

११.१३ उमेदवारांने www.ratnagiri.gov.in या संकेतस्थळावर अथवा कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर पात्र / अपात्र उमेदवारांची यादी विहीत मुदतीत पहाणे बंधनकारक राहील.त्यामुळे उमेदवाराकडून कोणत्याही कारणामुळे याबाबतीत झालेला विलंब ग्राहय धरला जाणार नाही.

११.१४ उमेदवाराचा अर्जात दिलेला पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक बदलल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परीक्षेची संधी वाया गेल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

११.१५ उमेदवाराने परीक्षेसाठी स्वखर्चाने येण्याचे आहे.

११.१६ सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार आवश्यक तर अर्ज करणे आवश्यक आहे.

११.१७ लेखी परीक्षा **रविवार, दिनांक १३/०१/२०१३** रोजी घेण्यात येणार असून परीक्षेचे स्थळ व वेळ तसेच परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच रत्नागिरी जिल्हयाच्या www.ratnagiri.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना त्यांची प्रवेशपत्रे पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील. ज्या पात्र उमेदवारांना त्यांची प्रवेशपत्रे न मिळाल्यास त्यांनी ती या कार्यालयात **दिनांक ०९/०१/२०१३ ते ११/०१/२०१३ पर्यन्त कार्यालयीन वेळेत** समक्ष उपस्थित राहून घ्यावयाची आहेत.प्रवेश पत्रे घेताना उमेदवारांनी त्यांचे अर्जावर चिकटविलेल्या फोटोसारखेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व स्वतःची ओळख सिध्द करणारा छायांकित पुरावा सोबत आणावा. फोटोवरील छायाचित्र सहा महिन्यापेक्षा जुने नसावे.

११.१८ उमेदवारांनी या भरतीप्रक्रियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना www.ratnagiri.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यन्त कृपया वरील वेबसाईट उमेदवारानी वेळोवेळी पहावी.

११.१९ प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. आक्षेप/हरकतींचा विचार करुन नंतर अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**सही/- राजीव जाधव**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी**

<u>**अर्जाचा नमुना**</u>

<u>**(प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज भरणे बंधनकारक आहे.)**</u>

अर्जाचा कार्यालयीन क्र.-----

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी तथा,**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी**
**पोस्ट बॉक्स नंबर ७, प्रधान डाकघर,**
**गाडीतळ, ता. जि. रत्नागिरी ४१५ ६१२.**

**------------- या पदासाठी अर्ज**

**जाहिरातीचा क्रमांक व दिनांक :-**

---

* **१) संपूर्ण नांव** आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे नांव

---

दोन्ही भाषेत मराठीत

---

इंग्रजीत

---

* **२) पत्र व्यवहाराचा पत्ता** (पीनकोडसह)
मराठीत

---

* **३) दुरध्वनी क्रमांक :-** **मोबाईल क्रमांक :-**

* **५)** जातीचा मूळ प्रवर्ग (खालील चौकोनात ✓ अशी खूण करावी.) सोबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेतलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

* **६)** ज्या प्रवर्गातून अर्ज सादर करीत आहे तो प्रवर्ग व समांतर आरक्षण नमूद करणे आवश्यक आहे.(खालील चौकोनात/कंसात ✓अशी खूण करावी.) सोबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेतलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधकारक आहे.

| प्रवर्ग | | | | | | | समांतर आरक्षण | समांतर आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | इ.मा.व. | खुला | महिला | |
| | | | | | | | | |

* **७) (अ)** अर्जदार यांचे **दिनांक ३१/०३/२०१३** पर्यंत नुतनिकरण केलेले होय / नाही
**नॉनक्रिमीलेयर** आहे काय? **(लागू असल्यास प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे)**

**(ब)** उमेदवार अपंग आहे काय? होय / नाही
अपंगाचा प्रकार - --------------------------------
**(असल्यास अपंगाचा प्रकार नमूद करुन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे)**

**(क)** उमेदवार यांनी जात/जमातीचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? होय / नाही
**(लागू असल्यास प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे)**

**(ड)** उमेदवार माजी सैनिक आहे काय? होय / नाही
**(असल्यास डिसचार्ज बुकाची प्रत जोडणे बंधकारक आहे)**

**(इ)** उमेदवार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य किंवा सन १९९१ चे जनगणना कर्मचारी किंवा १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी आहे काय? होय / नाही
**(असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र/दाखला किंवा अन्य पुरावा जोडणे बंधनकारक आहे)**

**(फ)** उमेदवार प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त आहे काय? होय / नाही
**(असल्यास प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधकारक आहे)**

**(ग)** उमेदवार अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडू आहे काय? होय / नाही
**(असल्यास खेळविषयक प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधकारक आहे)**

**(ह)** महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल) जोडले आहे काय? होय / नाही
**(प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे)**

---

८) लिंग (पुरुष) / (स्त्री )

---

* ९) **(अ)** अर्जदाराची जन्मतारीख (आकड्यात) दिनांक महिना वर्ष

**(ब)** दिनांक ३०/११/२०१२ रोजी होणारे पूर्ण वय (अंकात) वर्ष महिना दिवस

**(क)** जन्मठिकाण गाव तालुका जिल्हा

---

१०) वैवाहीक स्थिती (विवाहित) / (अविवाहित)

---

*११) **(अ)** शैक्षणिक अर्हता **(प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.)**

| **अर्जदाराची शैक्षणिक व अन्य अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल)** | **शाळा/तांत्रिक विद्यालय विद्यापीठ परिक्षा मंडळाचे नांव** (शाखा व विषय नमूद करावेत) | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **प्रमाणपत्राचा क्रमांक दिनांक व मिळालेल्या गुणांची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| **अ)** किमान शैक्षणिक अर्हता परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र. | | | |
| **ब)** अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | | | |
| **क)** संगणक अर्हता परीक्षा (MS-CIT) प्रमाणपत्र | | | |
| **(लागू असलेल्या प्रमाणपत्रांची प्रत जोडणे बंधकारक आहे)** | | | |

*** १२) अनुभव**

| अ.क्र. | ज्या पदावर काम केले त्या पदाचा तपशिल व पदाचा वर्ग | वेतनश्रेणी | कार्यालयाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | सेवा कालावधी | | सेवा सोडली असल्यास सोडल्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

**(वरीलप्रमाणे अनुभव प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरेल.)**

---

*** १३) परीक्षा शुल्क**

रेखांकित पोस्टल ऑर्डर क्रमांक दिनांक रक्कम

---

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती ------------------------------------------------ यांचा मुलगा/मुलगी/पत्नी असे प्रमाणित करतो/करते की, आपले जिल्हा आस्थापनेवरील पदभरतीची जाहिरात क्रमांक ससाशा/नपाप्र/नप (गट-क)/पदभरती/सीआर-१७/२०१२, दिनांक ०६/१२/२०१२ काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्ठर्थ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहेत. वर नमूद केलेली माहिती चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक :- **(सही)**

स्थळ :- **(उमेदवाराचे संपूर्ण नांव)**

---

**टिप:-**१. " ***** " या चिन्हाने दर्शविलेली माहिती उमेदवाराने/अर्जदाराने पूर्णपणे भरणे बंधनकारक आहे. तसेच लागू असलेली प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अन्यतः अर्ज अपात्र ठरेल. याची उमेदवारांने/अर्जदाराने नोंद घ्यावी.

२. उमेदवाराने/अर्जदाराने **जाहिरात मसूद्यातील बाब क्र.८** मधील लागू असलेल्या प्रमाणपत्राची/दाखल्याची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणेबंधनकारक आहे. न जोडल्यास अर्ज अपात्र ठरेल.

३. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन (नमूना-अ) उमेदवाराने/अर्जदाराने अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरेल.

४. पदाचा व पदाच्या प्रवर्गाचा आवर्जून उल्लेख करावा व संबंधित कागदपत्रे अर्जासोबत जोडावी.

५. उमेदवाराने अर्जासोबत १० सें.मी. X २२ सें.मी. आकाराचा स्वतःचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहिलेला व रुपये ५/- चे पोस्टाचे तिकिट लावलेला लखोटा लेखी परीक्षेसाठी बसण्याच्या प्रवेश पत्रासाठी पाठवावा.

६. रेखांकित पोस्टल ऑर्डरची रक्कम प्रवर्गाच्या अनुषंगाने भरलेली आहे का ? याची खात्री करावी. अर्जासोबत रेखांकित पोस्टल ऑर्डर जोडली नसल्यास अर्ज अपात्र ठरेल.

-------------

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना- अ**

प्रतिज्ञापन

नमूना - अ

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती./कुमारी -------------------------------------------------------------------------------------- श्री.------------------------------------------यांचा/यांचीमुलगा/मुलगी/पत्नी, वय ---- वर्षे, राहणार --------- ------- ------------------------------------------------याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते, कि, (१) मी ---------- --------------------------------------------------पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

(२) आज रोजी मला -------(संख्या) इतकी मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------आहे. (असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाणः-**

**दिनांकः-** **अर्जदाराची सही**

---

**परिशिष्ट - अ**

(जोडलेली प्रमाणपत्रे/दाखले)

खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या असल्यास ( ✓) अशी खूण करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | किमान शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | (   ) |
| २) | कोणत्याही वर्ग-३ चे पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र | (   ) |
| ३) | संगणक अर्हता परीक्षा (MS-CIT) प्रमाणपत्र | |
| ४) | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सन २०१२-२०१३ या चालू वित्तिय वर्षाचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्राची (म्हणजेच दि.०१/०४/२०१२ अथवा तद्नंतर निर्गमित केलेले प्रमाणपत्र) साक्षांकित प्रत. | (   ) |
| ५) | अपंगाबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकिय मंडळ यांचेकडील प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | (   ) |
| ६) | जात/जमाती बाबतचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | (   ) |
| ७) | लहान कुटुंब असलेबाबतचे नमूना- अ मधील प्रतिज्ञापन (मूळप्रतीत) | (   ) |
| ८) | विवाहीत महिला उमेदवारांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा विवाहानंतर नावामध्ये झालेल्या बदलाबाबतचे प्रतिज्ञापत्र. | (   ) |
| ९) | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची सांक्षाकीत प्रत | (   ) |
| १०) | अशंकालिन उमेदवार/स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/१९९१ चे जनगणना कर्मचारी/१९९४नंतरचे निवडणूक कर्मचारी यांनी संबंधित विभागाचे प्रमाणपत्र/दाखला यांची साक्षांकित प्रत | (   ) |
| ११) | अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडू यांनी यांची खेळ विषयक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती | (   ) |
| १२) | माजी सैनिक उमेदवार यांनी डिसचार्ज बुकाची साक्षांकित प्रत | (   ) |
| १३) | रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डर (मूळ) जोडली असल्यास | (   ) |
| १४) | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्राची (डोमेसाईल) साक्षांकित प्रत | (   ) |

**टिपः-** **अन्य प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडलेली असल्यास त्याचा उल्लेख अनुक्रमांकासह करावा.**